सत्यं शिवं सुंदरम् दिनांक:- 7/4/06

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर

एम.ए. व्दितीय वर्ष(मराठी)

शैक्षणिक वर्ष 2005-2006

## 'अभिप्राय'

प्रति,

प्रा.म.ई.तंगावार

मराठी विभाग

आदरनिय तंगावार सर,

सर, तुम्ही आमच्याकडून अभिप्राय मागितला आणि गुण-दोष सांगा असे म्हणाला परंतु सर तुमच्यातील दोष सांगायचे म्हटले तर मुळात ते दोष असायला पाहिजेत, परंतु मला गेली दोन वर्षाच्या अनुभवावरून तरी तुमच्यामध्ये दोष आढळले नाहीत

सर, तुमचा स्वभाव चांगला आहे तो आहे तसाच ठेवा, बदलू नका. मला तर तुम्ही वेळोवेळी मदत केली आहे. काहीही अडचण आली की सर सरांकडे मी कधीच गेले नाही कारण जे सर्वांना मदत करतात त्यांचीच मदत घेतली जाते. आणि म्हणून तुम्ही मला वेळोवेळी मदत केल्याबद्दल धन्यवाद!

असे म्हटले जाते की एखाद्या चांगल्या व्यक्तीबद्दल सांगायचे म्हटल्यास त्यांच्या सानिध्यात जास्त काळ राहिले पाहिजे, असे काहीही नाही सर शिवाजी कॉलेजमध्ये असतांना प्रा. कसाब सरांचे मला तर एक वर्षाचेच मार्गदर्शन लाभलेले आहे तरी परंतु सर, कसाब सरांना आम्ही कधीच विसरू शकत नाही ते आमच्यासाठी (माझ्यासाठी) एक आदर्श गुरु ठरलेले आहेत. तशाचप्रकारे सर तुम्हीसुध्दा आम्हाला एक वर्ष शिकवले, मार्गदर्शन केलात, वेळोवेळी सर्वांनाच मदत केलात म्हणून तुम्हीसुध्दा आमच्यासाठी एक आदर्श गुरुच आहात.

सर, दुसऱ्यावर्षी आमची सर्वांचीच खूप इच्छा होती की, तुम्हीच आम्हाला शिकवावे आणि आम्ही तसा खूप प्रयत्नही केला होता परंतु प्राचार्य सरांनी सांगूनसुध्दा आमचे कोणीच ऐकले नाही म्हणून आम्ही थोडे दिवस नाराज होतो.

सर, तुमच्या शिकवण्याबद्दल सांगायचे झाले तर तुम्ही शिकवलेले आमच्या लक्षात राहते. शिकवण्याची पध्दत अशीच ठेवा. सर तुम्ही वेळोवेळी चाचणी घेत

semisterwise

जा, त्यामुळे विद्यार्थ्यांचा थोडा अभ्यास होतो. असल्यामुळे अभ्यासाला वेळ कमी मिळतो. आमच्यावेळेस नसता तुम्ही प्रयत्न केलात सर परंतु त्याचा पश्चात्ताप मला आता होतो कारण आम्ही तुम्ही तुम्हाला साथ दिली नाही.

सर, तुम्ही आम्हाला शिकवण्याबद्दलच मदत केलात असे नाही तर इतर बाकीही केलात आणि सर मला तर वेळोवेळी पुस्तके देऊन मदत केलात. ~~कधीही~~ एकदाही नाही म्हणाला नाहीत त्याबद्दल मी तुमची आभारी आहे सर;

सर, मला तर तुमच्यामध्ये कसलेच दोष दिसून आले नाहीत [ही केवळ वरवरची स्तुती नाही सर तर अगदी मनापासून सांगते] त्यामुळे ~~तुम~~ केवळ तुम्ही सांगितलात म्हणून लिहू शकत नाही. एखाद्या चांगल्या व्यक्तीबद्दल कधीही चांगलेच म्हटले जाते.

सर, "तुम्ही सादर केलेल्या प्रबंधाबद्दल लवकरच तुम्हाला P.H.D. [डॉक्टरेट] ही पदवी मिळावी व याच महाविद्यालयात तुम्हाला नोकरी मिळावी अशीच माझी सदिच्छा आहे सर" कारण येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे आवश्यक आहे.

"सर, परत एकदा धन्यवाद!"

"तुमच्या भावी जीवनाबद्दल माझ्याकडून शुभेच्छा!"

पत्ता —
पाटील शोभा विद्यासागर
विकास नगर, देगलूर रोड,
आयुर्वेदीक कॉलेजच्या पाठीमागे
उदगीर. - जि. - लातूर